# <u>प्रकरण क्र.16</u>

# <u>मॅन्युअल - 15</u>

**माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील प्रकरण - दोन खंड (4)(1)(ख)(पंधरा) नुसार**

सार्वजनिक वापरासाठी ग्रंथालय अथवा वाचनालय परिरक्षित केले असतील तर त्यांच्या कामाच्या तासांसह माहिती मिळविण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचे तपशील.

मालमत्तांचे करनिर्धारण व मालमत्ताकरांचे संकलन याविषयीची माहिती विविध नोंदवह्या व दस्तऐवजाद्वारे परिरक्षित केली जात असल्यामुळे सार्वजनिक वापरासाठी ग्रंथालय, वाचनालय इत्यादीतून नागरीकांना माहिती मिळविण्याची वेगळी सुविधा करण्यात आलेली नाही.

करदाते/जागेचे भोगवटादार आणि जनता यांचा लेखी अर्ज प्राप्त झाल्यावर व आवश्यक असेल तेथे यापूर्वीच विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूची शुल्कांचे अधिदान केल्यानंतर त्यांना संपूर्ण माहिती पुरविण्यात येते.

प्रत्येक वर्षी 20 नोव्हेंबर ते 14 डिसेंबर या कालावधीत विवक्षित मालमत्तेचे करदाते व भोगवटादार मालमत्तेच्या तपशीलांची निशुल्क तपासणी करतील व उतारा घेतील. (करपात्रमुल्य संदर्भात)

अधिनियमाच्या कलम 161(2) नुसार कोणतीही सर्वसामान्य व्यक्ति, जी मालमत्तेशी करदाता किंवा भोगवटादार या क्षमतेत संबंधित नाही, वेळोवेळी विहित केलेल्या अनुसूची शुल्काचे अधिदान करुन मालमत्तेची तपासणी करतील आणि कोणतीही माहिती मिळवतील.